<u>नाशिक महानगरपालिका नाशिक</u>

<u>महिला व बालकल्याण विभाग</u>

<u>संक्षिप्त निविदा नोटीस क्र. १ सन २०२० ( फेर निविदा)</u>

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्यात नमुद केलेल्या कामाकरिता अनुभवी असणा-या ट्रॅव्हल एजन्सीकडुन निविदा (ऑनलाईन) पदधतीने मागविणेत येत आहे .

| अ.क्र | तपशिल | अंदाजे प्राकलन र. रुपये |
|---|---|---|
| १ | नाशिक महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती १२ पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी इत्यादी (नाशिक-मुंबई-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक) येथे अभ्यासदौ-याबाबत अशा अभ्यास दौ-याचे आयोजन करणे यामध्ये विमानप्रवास,मोटारप्रवास,राहण्याची व चहापान,भोजन,नाशत्याची व्यवस्था करणे इ.अनुषंगिक बाबीचा समावेश राहील. | ५,६४,०००/ |
| | एकूण | ५,६४,०००/ |

<u>अटि / शर्ती</u>

१) वरील कामाचे निविदा पत्रक (अटिशर्तीसह www.mahatenders.gov.in ) या संकेत स्थळावर दि.२० /०२ /२०२० ते दि.२७ /०२ /२०२० या कालावधीत उपलब्ध आहे .

२) निविदा सादरीकरणाची अंतीम मुदत दि.२७ /०२ /२०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले निविदा स्विकारले जाणार नाही.

३) कोणतेही निविदा स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील याबाबतची सविस्तर निविदा सुचना( www.mahatenders.gov.in ) या संकेत स्थळावर उपलब्ध आहे .इच्छुकांनी सदर संकेत स्थळावर भेट दयावी.

Sd/-

उपआयुक्त (समाजकल्याण)

नाशिकमहानगरपालिका नाशिक

# नाशिक महानगरपालिका नाशिक
## महिला व बालकल्याण विभाग
## निविदा पत्रक

१.निविदा सुचना क्र.:-०१

२.कामाचे नाव :- नाशिक महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्या यांच्या (नाशिक-मुंबई-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक) अशा अभ्यास दौ-याचे (८ दिवस ७ रात्री )आयोजन करणे

३.निविदाधारकाचे नाव व पत्ता :-

| अ.क्र | तपशील | मुळ रक्कम | जी.एस.टी. | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | १२ पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी इत्यादी प्रशिणार्थीची ३ स्टार हॉटेल मध्ये निवास व्यवस्था करणे | | | |
| २. | १२ पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांची (मुंबई ते त्रिवेद्रम व कोचीन-ते मुंबई ) अशी विमान प्रवासाची व्यवस्था करणे. | | | |
| ३. | आठ दिवस अभ्यास दौरा कार्यक्रमाच्या दिवशी नाश्ता,भोजन,चहा,रात्रीचे भोजन इत्यादी व्यवस्था करणे. | | | |
| ४. | १ एसी बस ने नाशिक ते मुंबई विमानतळ पर्यत सोडणे व पुन्हा परतीचे प्रवासाच्या वेळी नाशिक येथेसोडणे.(टोल आणि वाहन चालकाचे डीए समाविष्ट आहे.) | | | |
| ५. | अभ्यासदौ-या दरम्यान नाशिक-मुंबई-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक विमान **तळा**पर्यत.एसी. बसची व्यवस्था करणे. | | | |
| ६. | फोटोग्राफी करणेसाठी चांगल्या दर्जाच्या व्यवस्था करणे फोटोग्राफर सह व्यवस्था करणे. | | | |
| ७. | अभ्यासदौ-यात सहभागी होणा-या पदाधिकारी अधिकारी/कर्मचारी यांचा विमा उतरविणे. | | | |
| | | | | |

मा.आयुक्त सो.
मनपा नाशिक यांचेकडेस

मी/आम्ही सादर निविदे सोबतच्या अटी-शर्ती वाचल्या असुन समजुन उमजुन घेतल्या आहेत.मला/आम्हाला त्या अटी-शर्ती मान्य व कबुल आहेत.सदरचे निविदा अटी-शर्तीस अधिन राहुन सदरचा अभ्यासदौरा आयोजित करणेकामी मी/आम्ही वरील प्रमाणे निविदा दर सादर केलेला आहे.सदरच्या निविदा दराने सदरचा अभ्यासदौरा आयोजित करण्याचे काम आम्हास देण्यात यावे ही विनंती.

दिनांक - /  /२०२०

निविदाधारकाची सही

नाशिक महानगरपालिका, नाशिक

महिला व बालकल्याण विभाग

ई-निविदा सूचना क्र-१ (सन २०२०-२१)

**सविस्तर निविदा नोटिस**

# (Detailed Tender Notice)

१) **कामाचे नाव** : नाशिक महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्या यांच्या (नाशिक-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक) अशा अभ्यास दौ-याचे आयोजन करणे यामध्ये विमान प्रवास,मोटार प्रवास, राहण्याची चहापान,भोजन,नाशत्याची व्यवस्था करणे .

२) **कामाचे स्वरुप व अंदाजे प्राकलन र.रु ५,६४,०००/** : १. १२ पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी इत्यादी प्रशिणार्थीची ३ स्टार हॉटेल मध्ये निवास व्यवस्था करणे २.पदाधिकारी/सदस्यांची (नाशिक-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक) अशी विमान प्रवासाची व्यवस्था करणे. ३.आठ दिवस अभ्यास दौरा कार्यक्रमाच्या दिवशी नाश्ता,भोजन,चहा,रात्रीचे भोजन इत्यादी व्यवस्था करणे पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी १ एसी बसने नाशिक ते मुंबई विमानतळ पर्यत सोडणे व पुन्हा परतीचे प्रवासाच्या वेळी नाशिक येथे सोडणे.(टोल आणि वाहन चालकाचे डीए समाविष्ट आहे.) ४.अभ्यासदौ-या दरम्यान नाशिक-त्रिवेद्रम-कन्याकुमारी-आलपी-कोचीन-नाशिक विमानतळ पर्यत.एसी. बसची व्यवस्था करणे ५.फोटोग्राफी करणेसाठी चांगल्या दर्जाच्या व्यवस्था करणे फोटोग्राफर सह व्यवस्था करणे. ६.अभ्यासदौ-यात सहभागी होणा-या पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांचा विमा उतरविणे.

३) **निविदा बयाणा रक्कम** : र.रु.१३००० /- (अक्षरी तेरा हजार फक्त ) ना परतावा ऑनलाईन भरण बंधनकारक आहे. उक्त संकेतस्थळावर ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे.

४) **सुरक्षा अनामत रक्कम** : र.रु १६९२०/- (अक्षरी सोळा हजार नऊशे वीस फक्त) सदरची रक्कम ही "नाशिक महानगरपालिका नाशिक" या नावे राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेची बँक गॅरंटी या नुसार यशस्वी मक्तेदारास करारनामा करण्यापुर्वी नाशिक महानगरपालिकेकडे जमा करणे बंधनकारक राहील.

१) **निविदेची किंमत**: र.रु.२६००+४६८ +९० = ३१५८ (तीन हजार ऐकशे अठठावन्न फक्त ) जि.एस.टी.करासहीत)निविदेची रक्कम **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध होईल.

२) **ऑनलाईन निविदा विक्री** : दिनांक २० /०२/२०२० ते २७/०२/२०२० दुपारी ३.०० वाजता पर्यत **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन भरणा केल्या नंतर निविदा उपलब्ध होईल.

३) **ऑनलाईन निविदा सादर करण्याची तारीख** :ऑनलाईन निविदा लिफाफा क्र.१ व २ **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर सादर करण्याची अंतिम तारीख २७/०२/२०२० रोजी दूपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.

४) ऑनलाईन सादर केलेली निविदा दिनांक : २८/०२/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजे नंतर शक्य झाल्यास उप आयुक्त (समाजकल्याण), मनपा यांचे दालनात उघडण्यात येतील.

टिप:- ऑनलाईन निविदा विक्री व सादरीकरणाची मुदत सुटयांच्या दिवसा सह देण्यात आलेली आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास अथवा स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची राहील.

५) ऑनलाईन निविदा खरेदी व सादरीकरण करीता मक्तेदाराने डिजीटल स्वाक्षरी (**Key**) ची नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे.

६)**कामाचा कालावधी** : फेब्रुवारी २०२० अखेरपर्यत निश्चित केलेला दौरा कालावधी .

७) **निविदा पुर्व अर्हता** :-

१. मक्तेदाराचे **GST** रजिस्ट्रेशन असणे बंधनकारक

२.मक्तेदाराचे शॉप ॲक्ट/व्यवसाय कर लायसेंस रजिस्ट्रेशन प्रमाण पत्र.

३.मक्तेदाराचे पॅन कार्ड,असणे बंधनकारक.

४.मक्तेदाराचे मागील तीन वर्षाचे वार्षिक उलाढाल विचारात घेता एका वर्षाची सरासरी किमान उलाढाल (**प्रती वार्षिक र.रू. १० लक्ष पर्यंत**) असणे अनिवार्य आहे. त्याबाबतचे सनदी लेखापाल (**Chartered Accountant**) यांचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक. त्यासोबत मागील ३ वर्षाचे आयकर विभागाचे इन्कम टॅक्स रिटर्न.

५.विमान प्रवाससह ,३ स्टार हॉटेल व्यवस्था व इतर अनुषंगिक बाबीसह अभ्यासदौरा आयोजित केलेला असलेबाबत अनुभव असावा.

८) मक्तेदाराचे वार्षिक उलाढाल हे मागील तीन वर्षाचे .मक्तेदाराचे असणे आवश्यक आहे. सनदी लेखापाल **(Chartered Accountant)** यांचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक.

९) **ऑनलाईन लिफाफा क्र. १ मध्ये खालिल प्रमाणे कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सादर करावे :**

१) निविदा फॉर्म फी तसेच निविदा बयाना रक्कमेची ऑनलाईन भरणा केलेली पावतीची छायांकित प्रत

२) मक्तेदाराचे मागील तीन वर्षाचे वार्षिक उलाढाल विचारात घेता एका वर्षाची सरासरी किमान उलाढाल (**प्रती वार्षिक र.रू. १० लक्ष पर्यंत**) असणे अनिवार्य आहे. त्याबाबतचे सनदी लेखापाल **(Chartered Accountant)** यांचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक. त्यासोबत मागील ३ वर्षाचे आयकर विभागाचे इन्कम टॅक्स रिटर्न.

३) कोणत्याही एका शासकीय/निम शासकीय कार्यालय अथवा खाजगी क्षेत्रातल्या बँका, शाळा, कॉलेज, विद्यापीठ, नामांकित कंपन्या व तद्अनुषंगीक संस्थांपैकी कोणत्याही एका संस्थेच्या विमान प्रवाससह ३ स्टार हॉटेल इतर अनुषंगिक बाबीसह अभ्यासदौरा आयोजित केले बाबतचा कामाचा दाखला/संबंधीत अधिका-यांचे प्रमाणपत्र.

४) मक्तेदाराचे **GST** रजिस्ट्रेशन असणे बंधनकारक असुन त्याचे सर्टिफीकेट सादर करणे बंधनकारक आहे.

५) पॅन कार्ड, शॉप ॲक्ट/व्यवसाय कर लायसेंस रजिस्ट्रेशन प्रमाण पत्र.

६) संस्था/फर्मचे नांव, मक्तेदाराचे नांव, कार्यालयीन व निवासाचा संपुर्ण पत्ता, दुरध्वनी मोबाईलक्रमांक इ.माहीती निविदा धारकास लेटर हेडवर देणे आवश्यक.

१०) ऑनलाईन तांत्रीक कागदपत्रांचा **लिफाफा क्र.** १ चे कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच अर्हता प्राप्त मक्तेदारांच्या देकारचा **लिफाफा क्र.** २ ऑनलाईन उघडण्यात येतील.

११)**ऑनलाईन लिफाफा क्र.** २ मध्ये व्यापारी निविदा पत्रक स्कॅन करुन ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावे.

उपआयुक्त (समाजकल्याण )
नाशिक महानगरपालिका,नाशिक

वरील प्रमाणे अटीशर्ती मी/आम्ही वाचल्या असुन त्या मला /आम्हाला मान्य आहे.

निविदाधारकाची सही शिक्का

<u>निविदेच्या सर्वसाधारण अटीशर्ती</u>

१) लिफाफा क्र.१ मध्ये उल्लेखीत केल्यानुसार कागद पत्रे सादर न केल्यास त्यांचे लिफाफा क्र. २ ( देकार ऑफर) उघडण्यात येणार नाही तसेच त्यांची निविदा बाद ठरविणेत येईल.

२) निविदे बाबत काही वाद निर्माण झाल्यास निम्नस्वाक्षरीकार यांचा निर्णय अंतिम राहिल.

३) मक्तेदारांच्या कोणत्याही प्रकारच्या अटीशर्ती मान्य केल्या जाणार नाही, अटीशर्ती असलेल्या निविद बाद करण्यात येतील.

४) ज्या निविदाधारकाची निविदा अंतिम केली जाईल त्यांनी र.रु.५००/- (पहिल्या १० लाखासाठी) चे व पुढिल प्रत्येक लाखाला र.रु.५००/- च्या स्टॅम्प पेपर अथवा फ्रँकिंग करुन नाशिक महानगरपालिकेशी करारनामा करुन दयावा लागेल. अशा करारनामास दोन सक्षम मक्तेदारांचे जामिन धारक म्हणून स्वाक्षरी असणे बंधनकारक राहिल.

५) कामाचा मक्ता स्विकारण्याची मुदत ७ दिवसाची राहील. न्युनतम मक्तेदाराने जर काम स्विकारले नाही तर सदर काम दुस-या मक्तेदारास (Risk & Cost) वर देण्यात येईल. त्या बाबत दुस-या मक्तेदारास काम दिले बाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा/नोटिस दिली जाणार नाही.

६) निविदाधारकाने दिलेल्या कालावधी मध्ये काम पुर्ण केले नाही तर सदरचे काम इतर निविदाधारकाडुन करुन घेण्यात येईल. व त्यासाठी लागणारा जादा खर्च आल्यास तो संबंधित मुळ मक्तेदारा कडून वसूल केला जाईल व त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन, मक्तेदारास काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

७) मक्तेदारास सदर कामाचे कोणत्याही प्रकारचे अगाऊ (Advance) बिल देण्यात येणार नाही.

८) निविदा फॉर्ममध्ये दर इत्यादी लिहीतांना काही दुरुस्ती अथवा खाडाखोड केलेली असल्यास त्या ठिकाणी मक्तेदाराचे स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे. तसे नसल्यास सदर दरांचा विचार केला जाणार नाही व अशा प्रकारची निविदा बाद ठरविण्यात येईल.

९) सदर अटीशर्ती मधील एखाद्या निविदा अटी शर्ती बाबत शिथिलता देणेस अथवा आवश्यक अशा काही अटीशर्तींचा समावेश करणे इ. बाबतचे अधिकार नाशिक महानगरपालिकेने राखुन ठेवण्यात आले आहे.

१०) मक्तेदारांनी सर्व करासहित (जि.एस.टी., चढाई, उतराई, हमाली व वाहतुक खर्च इ. सर्व करांसहीत) निविदा दर भरणे आवश्यक आहे त्याव्यतिरिक्त इतर कोणताही कर किंवा नविन कर लागु झाल्यास असा कोणताही कर मनपातर्फे अदा केला जाणार नाही.

१०)

११) निविदे बाबत मक्तेदार व नाशिक महानगरपालिका यांचे मध्ये वाद विवाद निर्माण झाल्यास संबंधीत दावे खटले हे मे. नाशिक कोर्टात दाखल करणे बंधनकारक आहे.

१२) <u>कामे पार पाडण्याची पध्दत</u>:- कोणतेही कामाची अंमलबजावणी करण्यापूर्वी उप आयुक्त (समाजकल्याण), महिला व बालकल्याण विभाग यांची पुर्व परवांनगी घेतले नंतरच सदर कामे करावी, मनपाच्या संबंधीत अधिका-यांनी तयार केलेले नियम व अटी पध्दतीमध्ये मनपाचे नियुक्त अधिकारी योग्य बदल सुचवू शकतात, त्याचे पालन करणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

१३) सार्वजनीक हित संबंध - मनपाच्या अधिका-यांनी मक्ता कालावधी मध्ये वेळोवेळी दिलेल्या स्थानिक किंवा सार्वजनिक हिता संबंधी सर्व योग्य अथवा शासकीय कायदेशीर आदेश आणि निर्देश यांचे पालन करणे बंधनकारक आहे. यासाठी लागणारे आवश्यक ते वाढीव शुल्क किंवा आकार मक्तेदारास स्वखर्चाने करावे लागेल.

१४)  मक्तेदाराने शासकीय व निमशासकिय परवानग्या इत्यादी बाबतचे सर्व शुल्क स्वखर्चाने करावे.

१५) <u>करार रद्द करणे</u> - मा.आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना करार रद्द करण्याचे सर्व अधिकार राहतील व त्याकामी खालिल प्रमाणे करार रद्द करण्याची पध्दत अवलंबण्यात येईल -

अ) मक्तेदारास कारणे दाखवा नोटिस देण्यात येईल, मक्तेदाराने १० दिवसाच्या आत लेखी खुलासा सादर करणे बंधनकारक आहे. समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्यास करार संपुष्टात आणण्याची पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

ब) नाशिक महानगरपालिकेस गरज वाटल्यास इतर कोणतेही स्पष्टीकरण मक्तेदाराकडे मागता येईल.

क) विहित कालावधीत कारणे दाखवा नोटिसचे प्राप्त प्रत्युत्तर अथवा प्राप्त न झालेला खुलासा या बाबत आयुक्त नाशिक मनपा यांचेकडे सविस्तर लेखी रिपोर्ट सादर करण्यात येईल. त्यानंतर या बाबतीत मा.आयुक्त सो‍ा यांचे निर्देशानुसार उप संधी देण्यात येवून मक्तेदाराची सुनावणी घेण्यात येईल.

ड) करार संपुष्टात आणणे बाबत मा.आयुक्त नाशिक महानगरपालिका यांचे निर्णय अंतिम असतील व ते मक्तेदारावर बंधनकारक आहे. मात्र जो अंतिम निर्णय झाला असेल तो मक्तेदारास लेखी कळविण्यात येईल.

इ) करार संपुष्टात आणल्यानंतर मक्तेदारास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अदा केली जाणार नाही. मात्र मनपाचे नुकसान झाल्यास ती मक्तेदाराकडून वसुल करण्यात येईल. सदरची नुकसान भरपाई मक्तेदाराने देणे बंधनकारक राहील.

ई) मक्ता कालावधीत राहिलेले काम मक्तेदाराच्या (रिस्क ॲन्ड कॉस्ट) व्दारे दुस-या मक्तेदाराकडून उर्वरित कालावधीसाठी काम देण्यात येईल. तसेच मक्तेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व आर्थिक नुकसानी पोटी व इतर संबंधीत बाबीं करीता मक्तेदारा विरुध्द, आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना मा.न्यायलयात दावा दाखल करण्याचे पुर्ण अधिकार राहतील.

१६) सुरक्षा अनामत रक्कम कामाचा मक्ता संपे पर्यंत मनपाच्या ताब्यात राहिल मात्र त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१७) यशस्वी मक्तेदारास कामाचा मक्ता दिल्यानंतर व त्यांचे समवेत करारनामा झाल्यानंतर उर्वरीत मक्तेदारांची निविदा बयाणा रक्कम परतावा करण्यात येईल.

१८) मक्तेदाराने दिलेल्या वेळेत काम पुर्ण न केल्यास मक्तेदाराच्या Risk & Cost वर दुस-या मक्तेदाराकडुन सदर काम करून घेण्यात येईल. तसेच मक्तेदाराची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येवून मक्तेदारास काळया यादीत टाकण्यात येईल.

१८) अभ्यास दौ-याचे सुक्ष्म नियोजन ट्रॅव्हल एजन्सीने करावयाचे आहे.सदरचे नियोजन पाच दिवस अगोदर सभासदाना लेखी अवगत करावयाचे आहे.

१९) दिलेल्या तारखेस व वेळेत अभ्यास दौरा पार न पाडल्यास व आवश्यक ती सुखसुविधा उपलब्ध न झाल्यास एजन्सीस जबाबदार धरुन त्यानुसार मनपा निश्चित करेल त्या दरानुसार कपात करण्यात येईल.त्याची सर्व जबाबदारी ट्रॅव्हल एजन्सीची राहील.

२०) नाशिक मनपा हद्दीतील ट्रॅव्हल एजन्सीस प्राधान्य देण्यात येईल.

२१) अभ्यास दौ-यामध्ये अंदाजे १३ व्यक्तीचा समावेश असेल.त्यात प्रामुख्याने महिला पदाधिकारी व सदस्य तसेच अधिकारी /कर्मचारी इ.चा समावेश असेल.दौ-यात महिला असल्याने प्रवासात व राहण्याच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षाकरीता योग्य ती दक्षता ट्रॅव्हल एजन्सीने घेणे बंधनकारक.

२२) ट्रॅव्हल एजन्सीकडे अभ्यासदौ-यासाठी गाईड असणे आवश्यक आहे.गाईडला इंग्लीश ,हिदी व मराठी भाषेचे ज्ञान अवगत असावे.

२३) दौरा पुर्ण झाल्यानंतर,दौ-यासाठी झालेल्या खर्चाचे बीले ट्रव्हल एजन्सीने महिला व बालकल्याण विभागाकडे सादर केले नंतर देयके अदा करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

२४) ट्रॅव्हल एजन्सीने सदर दौ-यासाठी जाणा-या सर्व सदस्यांचा अपघाती विमा उतरविणे बंधनकारक राहील.

२५) सदर अभ्यासदौरा आयोजित करणेचे कामासाठी कोणतीही ॲग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

२६) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कार्यक्रमामध्ये बदल व अटीशर्तीत बदल करणे इ.बाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त सो.नाशिक मनपा यांचे राहतील.

उपआयुक्त (समाजकल्याण )
नाशिक महानगरपालिका,नाशिक

वरील प्रमाणे अटीशर्ती मी/आम्ही वाचल्या असुन त्या मला /आम्हाला मान्य आहे.

निविदाधारकाची सही
शिक्का